महाराष्ट्र पोलीस

-: प्रसिध्दीपत्रक :-

वाहतुक शाखा, पुणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,

बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./४२७०/२०२४ दिनांक :- १८/०६/२०२४

पुणे शहरातील लष्कर वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, लष्कर वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

लष्कर वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,

१) एम.जी.रोड कॅम्प येथील वाय जंक्शन ते ट्रायलक हॉटेल चौक पर्यंत रस्त्याच्या पुर्व तसेच पश्चिम दिशा नो पार्किंग करण्यात येत आहे.

२) वाय जंक्शन ते १५ ऑगस्ट चौक पर्यंत रस्त्याच्या पुर्व बाजुस नो पार्किंग तसेच रस्त्याच्या पश्चिम बाजुस सिरीयल माता मेढी मंदीर ते १७४,रेडीएंट स्पॉट,शॉप नं.१ पर्यंत दुचाकी पार्किंग तसेच १७४,रेडीएंट स्पॉट, शॉप नं.१ पासून पुढे १८२,जय अम्बे मोटर्स या दुकानापर्यंत चार वाहनांसाठी ॲग्युलर पार्कींग करण्यात येत आहे.

३) १५ ऑगस्ट चौक ते महमंद रफी चौकापर्यंत रस्त्याच्या पुर्व बाजुस १४०,हेमा फ्लोवर्स,एम.जी.रोड ते ९५, प्लेटेनियम लायटनिंग,एम.जी.रोड या दुकानापर्यंत तसेच रस्त्याच्या पश्चिम बाजुस १८५,चौधरी असोसिएटस,एम.जी.रोड ते महमंद रफी चौक (एस.बी.आय.ए.टी.एम.) पर्यंत रस्त्याचे दुतर्फा दुचाकी वाहनाचे पार्किंग करण्यात येत आहे.

४) महमंद रफी चौक (एस.बी.आय.ए.टी.एम.) ते कोहीनुर हॉटेल रस्त्याच्या पश्चिम बाजुस २४१,बिल्लीमोरीया कॉस्मेटिक ॲन्ड लेडीज टेलर,कॅम्प या शॉपपर्यंत तसेच पुर्व बाजुस ९३,शमुन्स फ्लॉवर्स,एम.जी.रोड, कॅम्प,पुणे ते ३७,एम.जी.रोड,महावीर चौकाजवळील पुर्व बाजुचे बाटा शोरुम पर्यंत सम विषम तारखेस आलटून पालटुन एका बाजुस दुचाकी तर दुस-या बाजुस ॲग्युलर चारचाकी वाहनाचे पार्किंग करण्यात येत आहे.

५) कोहीनुर हॉटेल चौक ते महावीर चौकापर्यत पश्चिम बाजुस २४५/४६,प्रिया हॉटेल,एम.जी.रोड,कॅम्प पुणे ते,२८५,डीनोव्हो क्लोथ मार्ट,एम.जी.रोड,कॅम्प,पुणे पर्यंत सम विषम तारखेस आलटून पालटुन एका बाजुस दुचाकी तर दुस-या बाजुस ॲग्युलर चार चाकी वाहनाचे पार्किंग करण्यात येत आहे.

६) महावीर चौका ते नाझ चौकापर्यत पश्चिम बाजुस २९०,कॅन्टाबिल,एम.जी.रोड ते ६,सारेगामा म्युझिकल शॉप,एम.जी.रोड,कॅम्प पुणे पर्यंत तसेच पुर्व बाजुस ३१/३२,बॅक ऑफ बडोदा,एम.जी.रोड,कॅम्प पुणे ते २७, आदिदास क्लोथ शॉप पर्यंत सम विषम तारखेस आलटून पालटुन एका बाजुस दुचाकी तर दुस-या बाजुस ॲग्युलर चारचाकी वाहनासाठी ॲग्युलर पार्किंग करण्यात येत आहे.

७) नाझ चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयापर्यत मोलेदिना रस्त्यावर रस्त्याच्या पश्चिम बाजुस शॉप नं.५, अलाईस इन जॅलेटो लॅन्ड,अरोरा टॉवर बिल्डिंग,कॅम्प,पुणे ते शॉप नं.९ कराची स्वीट मार्ट,अरोरा टॉवर बिल्डिंग,कॅम्प,पुणे पर्यंत दुचाकी वाहने पार्किंग तसेच पुर्व बाजुस शॉप नं.११,मॅजेस्टीक परफ्युम ॲन्ड ॲपरीयल्स स्टर्लिंग सेंटर बिल्डिंग,कॅम्प,पुणे ते शॉप नं.२,बगीचा कॉर्नर पर्यंत दुचाकी वाहने पार्किंग करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – १८/६ /२०२४ ते दिनांक – ३ /७ /२०२४ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

१८/६

(रोहिदास पवार)

पोलीस उप-आयुक्त ,

वाहतूक पुणे शहर

प्रति,

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी**, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१

२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- **२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ३**, पुणे शहर.

**३) पोलीस निरिक्षक, प्रेसरुम**, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) प्रभारी अधिकारी **लष्कर** वाहतुक विभाग, पुणे शहर.

२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

**५) पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

**६) पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.